पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७९ ■ मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -279 ■ Tuesday, 28 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## ‘बुड्ढे तेरे को ड्युटी करना आता है क्या?’; २ तासात सस्पेंडची धमकी देणाऱ्याची मुजोरी पोलिसांनी जिरवली

### शहरात अनेक मस्तवाल अशाच गुर्मीत फिरत आहे त्यांचीही मस्ती जिरवावी -नागरिक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी ट्राफिक कर्मचारीला धमकी देणाऱ्या आरोपीला २४ तासात अटक केली. आरोपी कुणाल बाकलीवाल याने भर रस्त्यात वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याला डिफेंडर गाडी थांबवल्याने धमकी दिली होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला बेड्या ठोकल्या.

मुझे नही पहचाना क्या? बुड्ढे तेरे को ड्युटी करना आती क्या? असं म्हणत दोन तासात सस्पेंड करण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याप्रकरणी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आरोपीला छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी डिफेंडर गाडी जप्त करत आरोपीला २४ तासात अटक केली आहे. कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर दादागिरी करणाऱ्यांना धडा शिकवला जाईल असा इशारा देखील पोलिसांनी दिला आहे. भर रस्त्यात ट्राफिक कर्मचाऱ्याला दोन तासात सस्पेंड करण्याची धमकी देणाऱ्याची पोलिसांनी जिरवली असून त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

कुणाल बाकलीवाल असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, वाहतूक शाखेचे अंमलदार दैनसिंग जोनवार तसेच सहाय्यक फौजदार बागुल यांच्यासह २४ जानेवारी रोजी सायंकाळी कर्तव्य बजावत होते. मिल कॉर्नर येथील सिग्नलवर सायंकाळच्या सुमारास कर्तव्य बजावत असताना यावेळी अचानक व्हीआयपी सायारान वाजवत एम.एच. २०जी. के.१८१९डिफफेंडर चारचाकी जात होती.यावेळी जोनवाल, बागुल यांनी वाहनाला थांबण्याचा इशारा केला. जवळी भाकरी वाली गाणे चार चाकी मधोमध रस्त्यात उभी केली.

यावेळी मुझे नही पहचाना क्या? बुढ्ढे तेरे को ड्यूटी करणे आती क्या? असे म्हणत दोन तासात सस्पेंड करण्याची धमकी दिली होती. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर क्रांती चौक पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील २४ तासांमध्ये संभाजीनगर पोलिसांनी आरोपीला अटक केले आहे.

छत्रपती संभाजी नगर शहरातील मिल कॉर्नर येथे वाहतूक शाखेचे कर्मचारी कर्तव्य बजावत असताना चार चाकी चालकांने कर्मचाऱ्याला धमकी दिली होती. याप्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून या प्रकरणी आरोपीला ताब्यात घेतला आहे. कर्मचाऱ्यांवर दादरी करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असं पोलीस उपायुक्त नितीन बगाटे म्हणाले.



### ‘त्याला योग्य धडा शिकवला जाईल’

महाराष्ट्र पोलिस दल हे प्रोफेशनल दल आहे. पोलिसांवर अशी दादागिरी खपून घेतली जाणार नाही. कायदा सर्वांसाठी सारखा आहे. जो नियम तोडेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. मग तो कोणत्याही राजकीय नेत्याच्या जवळील असला तरी कारवाई तर होणारच तसेच त्याला योग्य धडा शिकवला जाईल.

**– नितीन बगाटे,**
पोलिस उपायुक्त.

## एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट आक्रमक; संभाजीनगर जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा स्थापन झालेल्या महायुती सरकारने एसटी महामंडळाच्या तिकीट दरामध्ये वाढ केली आहे. या निर्णयाविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने राज्यभरात आंदोलन करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता राज्यातील प्रमुख एसटी डेपोजवळ हे चक्काजाम आंदोलन होणार आहे. या माध्यमातून एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजच चक्काजाम आंदोलन करण्यात आले. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झाले. या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

राज्यातील सर्वसामान्य जनतेला एसटी महामंडळाने केलेली भाडेवाढ परवडणारी नाही. दुसरीकडे तुम्ही वायफळ खर्च करत आहात आणि एसटीची भाडे वाढ करता? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. त्यामुळे एस टी महामंडळाने केलेली भाडेवाढ रद्द करणेच योग्य होईल. नसता ही सर्वसामान्य प्रवाशांवर अन्यायकारक असा हा निर्णय असेल, असे देखील दानवे यांनी म्हटले आहे. अजित पवार हे देखील भाडेवाडीच्या विरोधात बोलत आहेत. तर मग अशावेळी ते अर्थमंत्री आहेत, त्यांनी भाडेवाढ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली. परिवहन मंत्री भाडेवाढ झालेले मलाच माहीत नसल्याचे सांगत आहेत. मग सरकारमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे.

**तिकिटाच्या दरामध्ये १४.९७ टक्के एवढी भाव वाढ**

महाराष्ट्रातील जनता आधीच महागाईने त्रस्त झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या खिश्यावर एसटी महामंडळाच्या भाडेवाडीतून आणखी ताण पडणार आहे, असा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. एसटी महामंडळाने तिकिटाच्या दरामध्ये १४.९७ टक्के एवढी भाव वाढ केली आहे. या विरोधामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये आज ठाकरे गटाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. तर उद्या राज्यभर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देखील पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

**मंत्री सरनाईक यांना कल्पनाही नव्हती** – एस टी महामंडळाच्या वतीने एसटी बसच्या तिकिट दरामध्ये करण्यात आलेल्या दरवाढीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. या संदर्भात त्यांना प्रश्न विचारले असता अधिकाऱ्यांनी भाडेवाडीचा निर्णय परस्पर घेतला असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे एसटी भाडेवाढ लागू झाली तरी परिवहन मंत्र्यांना त्याची साधी कल्पनाही नव्हती का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाने उपस्थित केला आहे. २५ तारखेच्या मध्यरात्रीपासून राज्यभरात ही दरवाढ लागू झाली आहे.

**सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला झळ** – एसटी महामंडळाने आपल्या प्रस्तावात १४.९५ टक्के भाडेवाड करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. तर ऑटोरिक्षा व टॅक्सी भाडे संघटनांनी मुंबईत ३ रुपयांनी दरवाढ करण्याची मागणी केली होती. या दरवाढीमुळे ऑटोरिक्षाचे किमान भाडे २३ रुपयांवरून २६ रुपये, तर टॅक्सीचे किमान भाडे २८ रुपयांवरून ३१ रुपये होऊ शकते. टॅक्सी व ऑटोसाठी शेवटची भाडेवाड ऑक्टोबर २०२२ मध्ये करण्यात आली होती. एसटी कर्मचाऱ्यांचे वाढलेले पगार, इंधनाचे वाढीव दर, सुट्या भागांच्या वाढलेल्या किंमती आदी कारणांमुळे ही ही भाडेवाड करणे गरजचे असल्याचे सांगत एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाने भाडेवाढीला मंजुरी दिली आहे.



### मागील ३ वर्षांपासून दरवाढ झाली नाही

गत काही वर्षांत डिझेल, सीएनजी, एसटीचे सुटे पार्ट आदी गोष्टींमध्ये प्रचंड दरवाढ झाली आहे. त्यामुळे दरवर्षी ही दरवाढ अपेक्षित असते. पण मागील ३ वर्षांपासून ही दरवाढ झाली नव्हती, अशी पुस्तीही मंत्री सरनाईक यांनी यावेळी या दरवाढीचे समर्थन करताना जोडली होती.

## लग्नाला जाताना कारला भीषण अपघात, पुण्यातील दाम्पत्याचा एकत्रच करुण अंत

पुणे : लग्न सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी पुण्याहून कारने नाशिकला निघालेल्या दाम्पत्याचा अपघाती मृत्यू झाला. पुणे - नाशिक महामार्गावर असणाऱ्या माळवाडी शिवाराजवळ कारला भीषण अपघात झाला. यामध्ये पत्नी पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

सचिन वसंतराव दरेकर (वय ५७) आणि रमा सचिन दरेकर (वय ५३) अशी मृत्यू झालेल्या पती-पत्नीची नावे आहेत. सीमा सुरेंद्र देशमुख आणि सुरेंद्र देशमुख हे देखील त्यांच्यासोबत होते. त्यातील एक जण गंभीर जखमी झाला आहे. रविवारी हा अपघातात घडला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की पुण्यातील गुरुवार पेठ-दरेकर वाडा येथील सचिन वसंतराव दरेकर, त्यांची पत्नी रमा सचिन दरेकर, सीमा सुरेंद्र देशमुख आणि सुरेंद्र देशमुख असे चौघे जण रविवार दि. २६ रोजी पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास कारमधून लग्नासाठी नाशिक येथे जात होते.

## जिंतूर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा




जिंतूर:- राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष शाहेद भैय्या सिद्दिकी यांच्या तर्फे जिंतूर प्रीमियर लीग JPL क्रिकेट स्पर्धा ठेवण्यात आलेली होती, या क्रिकेट स्पर्धेत जिंकलेली टीम झौन इलेव्हन हा टीमला बाळासाहेब भांबळे व शाहेद भैय्य सिद्दिकी यांच्या हस्ते पहिली बक्षीस देण्यात आले, व दुसरा बक्षीस डॉक्टर जुनेद केअर हा टीमला हकीम लाला तर्फे देण्यात आली, क्रिकेट स्पर्धेची आयोजक कमिटी इमरान खान साहेब, अब्दुल आहद, मुखीद मिर्झा, युनुस बेग, व इतर खेळाडूंनी केली, हा स्पर्धेला सपोर्टेड कमिटी, प्रिन्स बिल्डर । डेवलपमेंट, आर.के मेडिकल, रॉयल दूध डेरी होती.. क्रिकेट स्पर्धा सनरायझर ग्राउंड वरुड रोड जिंतूर येथे होती...

## देशात सर्वाधिक सोयाबीन खरेदी महाराष्ट्रात गरज भासल्यास केंद्राकडे खरेदीची मुदत वाढवून मागणार – जयकुमार रावल

मुंबई : राज्यात नोंदणी झालेल्या ७ लाख ६४ हजार ७३१ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६९ हजार ११४ शेतकऱ्यांकडून ७ लाख ८१ हजार ४४७ मेट्रिक टन सोयाबीन खरेदी झाली असून ही खरेदी इतर राज्याच्या तुलनेने सर्वाधिक आहे. देशातील मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या राज्यांना मागे टाकत देशांमध्ये सर्वाधिक सोयाबीन खरेदी महाराष्ट्राने केली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

याबाबत माध्यमांशी बोलताना मंत्री श्री.रावल म्हणाले, अनेक जिल्ह्यांनी आपले खरेदी उद्दिष्ट पूर्ण केले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला अडचण येऊ नये यासाठी वेगाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया करण्याची तसेच दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम पोहोचेल या संदर्भात वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या आहेत. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याने सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल. तथापि, सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागीतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री श्री.रावल म्हणाले, राज्यात नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून नोंदणी सुरू केली होती. त्यानुसार दि.१५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यातील ५६२ खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष खरेदी सूरू करण्यात आली आहे. नोंदणी करता येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे नोंदणीची मुदत एक वेळा वाढवली. त्यानंतर सुरुवातीला सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी २०२५ पर्यंत होती, मात्र या मुदतीत अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी न झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांना विनंती करून खरेदीची मुदत दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवली आहे.

मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या प्रमुख सोयाबीन उत्पादक राज्यात खरेदीच्या तुलनेत महाराष्ट्राने आतापर्यंत सर्वाधिक खरेदी केली आहे. या सहा राज्यांची एकूण खरेदी १८ लाख ६८ हजार ९१४ मेट्रिक टन इतकी झाली असून यापैकी महाराष्ट्राने ७ लाख ८१ हजार ४४७ मेट्रिक टन खरेदी केली आहे. राज्यात नांदेड जिल्ह्यात ५७ हजार ५२८ शेतकऱ्यांकडून १ लाख २९० मेट्रिक टन इतकी सर्वाधिक सोयाबीन खरेदी झाली आहे. त्यापाठोपाठ हिंगोली जिल्ह्यात २९ हजार ७६४ शेतकऱ्यांकडून ६० हजार ९८९ मेट्रिक टन खरेदी झाली आहे. सुरुवातीच्या काळात आलेल्या सर्व तांत्रिक अडचणी दूर करून आजही वेगाने खरेदी प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री श्री.रावल यांनी सांगितले.

केंद्र सरकारने सन २०२४-२५ करीता सोयाबिनसाठी प्रति क्विंटल ४ चार ८९२ रुपये इतका हमीभाव घोषित केला असून त्यानुसार खरेदी सुरू आहे. हे दर मागील वर्षाच्या हमीभावापेक्षा २९२ रुपये प्रति क्विंटल इतके जास्त आहे. सन २०२४-२५ मध्ये लागवडीखालील क्षेत्र ५०.५१ लाख हेक्टर असून उत्पादन ७३.२७ लाख मेट्रिक टन अपेक्षित आहे. पीएसएस खरेदीसाठी केंद्र सरकारने १४ लाख १३ हजार २७० मे.टन (१९.२८ टक्के) मंजूरी दिली असल्याची माहितीही मंत्री श्री.रावल यांनी दिली आहे.

# स्मरण बाळासाहेबांचे...

सत्तरच्या दशकातला ६६-६७ चा काळ! 'बजाव पुंगी हटाव लुंगी' हा आवाज देत मुंबई शहरातला मराठी तरुण उभा झाला. पहाडाला धडक देण्याची ईर्षा त्याच्या मनात जागली होती. 'मी माझ्या समाजाची अवहेलना थांबवू शकतो, महाराष्ट्राला मी महान बनवू शकतो!' असा विश्वास त्या तरुणांच्या मनात जागला होता. हे सारं घडलं होतं बाळासाहेब ठाकरे या माणसामुळं! महाराष्ट्रानं भले भले 'मैदान गाजवू' वक्ते बघितले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा आवेश, आचार्य अत्र्यांचा सोलून काढणारा विनोद, प्रबोधनकारांच्या वाणीतली आग आणि व्यंगचित्र काढण्याचा सराव असल्यानं सहजपणे धोतराला हात घालणारी भाषा वापरण्याची सवय यांचं हे अजब रसायन मात्र नवं होतं, ते तरुणांना हवं होतं. बाळासाहेब तेव्हा शाल पांघरत नसत. उलट पोशाख आणि सगळाच आविर्भाव व्यंगचित्रकाराचाच होता. पण महाराष्ट्रावर, मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायानं हा माणूस नुसता धगधगला होता. हे सारं थांबविण्याची जणू होड घेऊनच मैदानात उतरला होता. आई भवानीचा आशीर्वाद पाठीशी असल्याचं बाळासाहेब सांगायचे. पण पाठीशी प्रबोधनकारांचा, वडिलांचा आशीर्वाद आणि त्यांचीच परंपरा होती. बाळासाहेब बघता बघता साऱ्या लढाऊ मराठी तरुणांचे सेनापती झाले. ही पोरं साधीसुधी नव्हती. बाळासाहेबांच्या शब्दासाठी प्राण द्यायची त्यांची तयारी होती. त्यावेळी कलानगरातल्या 'मातोश्री' बंगल्याचं अस्तित्व नव्हतं. रानडे रोडवरच्या इवल्याशा जागेतली एक खोली हा सेनापतींचा दरबार! बाहेर छात्या फुगवलेल्या मावळ्यांची ही झुंबड. आपल्या नेत्याला आपणच मोठा करायचा हे स्मरून वागणारे हे मावळे! येणाऱ्याला आपल्या नजरेच्या जरबेनं जोखणारे, त्याला पायातले चपला-बूट काढून ठेवायला लावणारे. बाळासाहेबांशी कुणी जादा सलगी दाखवू नये याची काळजी घेणारे, मी गेलोय या दरबारात. बाळासाहेबांना अगदी लवून मुजराही केलाय. संयुक्त महाराष्ट्र होऊनही मराठी नेते ताठ मानेनं दिल्लीत उभे होत नव्हते. नेहमीप्रमाणे वितंडवाद घालून संयुक्त महाराष्ट्र समिती नावाची ताकद आम्हीच नष्ट केली होती. आचार्य अत्र्यांचं सामर्थ्यही ओसरलं होतं. अशावेळी मराठी मनाला उभारी देणारा आवाज होता फक्त नि फक्त बाळासाहेब ठाकरे यांचा! हा महाराष्ट्र लाचार लतकोडग्या नेत्यांनी कंबरेत मोडला होता. त्याला हात धरून 'ऊठ वीरा, तुझा कणा सह्याद्रीचा आहे. आम्ही तुला वाकू-झुकू देणार नाही...!', असा विश्वास देत बाळासाहेब हर हर महादेवची ललकारी घुमवत होते. त्यांच्यापुढं मस्तक झुकवण्यातसुद्धा एक थरार होता. मुंबईतच नव्हे, साऱ्या मराठी मुलुखात बाळासाहेब यांचा आवाज जायलाच हवा, असं मानून मी मराठी माणसाच्या हितासाठी झुंजणाऱ्या शिवसेनेच्या बाजूनं उभाही झालो. फारच थोडे बोटावर मोजता येतील असे मराठी पत्रकार शिवसेनेच्या साहाय्याला उभे होते. बाकी एकजात विरोधात. इंग्रजी वृत्तपत्रांनी तर शिवसेनेविरुद्ध अपप्रचाराचा आगडोंबच उभा केला होता. प्रांतवादी, राष्ट्रविघातक, ऐक्यावर आघात करणारी, फॅसिस्ट, गुंड सेना असा गजर चालला होता. विविध पक्षांचे राष्ट्रीय पुढारी ह्या संघटनेविरुद्ध सतत बोलत होते पण शिवसेनेला मराठी तरुणांनी आपलं म्हटलं होतं! बाळासाहेबांना साथ देण्याचा त्यांचा निर्धार होता. प्रारंभाला मुंबई-ठाणे एवढाच शिवसेनेचा, अन् बाळासाहेबांचा व्याप होता. पण दणका असा जबरदस्त होता की, सारा देश डोळे विस्फारून शिवसेनेकडं, बाळासाहेबांकडं बघत होता. त्यांची ही निर्माण झालेली ताकद कशी वापरायची, केव्हा वापरायची याचाही विचार सुरू होता. शिवसेनेला आजवर बहुतेक सगळ्याचराजकीय पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी वापरलंय, आपल्या गरजेपोटी आपलं म्हटलंय. कम्युनिस्टांचा कामगार भागातला दबदबा मोडून काढण्यासाठी काँग्रेसवाल्यांनी शिवसेना वापरली. प्रजा समाजवाद्यांनी शिवसेनेशी तर युतीच केली होती. समाजवादी नेते मधू दंडवते त्यावेळी शिवसेनेच्या समर्थ राष्ट्रवादाची भलामण करीत होते.

सगळ्यात शेवटी हिंदुत्वाचं राजकारण करणाऱ्या भाजपेयी मंडळींनी शिवसेना वापरली. आणि तेव्हापासून शिवसेना पचवायची उमेद धरून आजही भाजपेयी नेते शिवसेनेकडे बघून जिभल्या चाटत असतात. त्यामुळं त्यांनी फुटीरांना हाताशी धरून आपलं साध्य साधलं होतं. शिवसेनेचा विचार हा केवळ बाळासाहेब ठाकरे यांचाच विचार होता आणि आजही आहे. मराठी माणसापासून हिंदुत्वापर्यंतचा शिवसेनेचा प्रवास झालाय. मुळात हिंदुत्वाचं राजकारण करताना हिंदुत्वाचा जसा आणि जेवढा विचार व्हायला हवा होता तेवढा विचार शिवसेना या संघटनेनं आणि स्वतः बाळासाहेब ठाकरे यांनी केलेला नाही. त्यांच्याभोवती राष्ट्रीय स्वयंसेवक संघातली काही मंडळी जमा झाली होती. त्यांनी बाळासाहेबांसाठी नव्हे तर बाळासाहेबांभोवती जमलेल्या मराठी तरुणांसाठी हे हिंदुत्वाचं जाळं लावलं होतं. मिळतील तेवढे शिवसैनिक भाजपकडं वळविण्याचा हेतू धरूनच हे हिंदुत्वाचं राजकारण आजतागायत सुरूच आहे. भाजपेयी नेत्यांनी आपला कावा अनेकदा आपल्या कृत्यांतून दाखवून दिलाय. बाळासाहेबांचा 'हिंदुहृदयसम्राट' ह्याच मंडळींनी बनवलाय. हिंदुत्व हे पाऱ्यासारखं आहे, ते जेवढ्या झटकन एकत्र येतं तेवढ्याच झटकन असंख्य स्वतंत्र गोलात विभागलं अन् विखुरलंही जातं. हिंदुत्वाचं राजकारण ही सोपी गोष्ट नाही. हिंदूंना एकत्र आणण्यासाठी जो संवाद साधायला हवा तो साधण्यासाठी जो प्रवास आणि प्रयास वैचारिक आणि प्रत्यक्ष करायला हवा, तो शिवसेनेत कुणी केलाय? 'हिंदुहृदयसम्राट' बाळासाहेब ठाकरे हे दादर, गिरगाव, सदाशिव-नारायण पेठ, औरंगाबाद-परभणी इथल्या जनतेला मान्य होऊ शकतील, पण हे तमाम हिंदूंना मान्य होतीलच असं त्यावेळी नव्हतं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना हिंदुहृदयसम्राट म्हणत पण हा सम्राटही अखेर फक्त पुण्या-मुंबईपुरताच उरला होता. भाषाभिन्नतेवर आणि पंथभेदावर मात करून साऱ्या हिंदूंना राजकारणापुरतं का होईना, एकत्र आणायला हवं हा विचार आजचा नाही. तो स्वातंत्र्यलढ्यापासूनचा आहे. पण तो आजवर कधीच प्रत्यक्षात येऊ शकलेला नाही. याची जाणीव हिंदुत्वाचं राजकारण करणाऱ्यांनी तरी ठेवायला हवीय. मराठी माणसाच्या काळजाला हात घालणाऱ्या आणि मराठीच्या, महाराष्ट्राच्या भल्यासाठी वाटेल ते साहस करू शकणाऱ्या एका नेत्याला हिंदुत्वाच्या स्वप्नरंजनात अडकवून महाराष्ट्राचा काही मंडळींनी घात केला होता. बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट बनवणाऱ्यांनी त्यांना आणि तमाम शिवसैनिकांना चक्क बनवलं होतं. गृहलक्ष्मी म्हणून स्त्रीला पायाची दासी बनविण्याचा प्रकार होतो, त्याच धर्तीवर म्हणायचं हिंदुहृदयसम्राट आणि बनवायचं भाजपेयींचं मांडलिक असा प्रकार यात होता.

# भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष

## लाला लजपत राय जयंती विशेष

लाला लजपत राय हे भारतीय लेखक आणि राजकीय नेता होते. हे पंजाबी, भारतीय राजकारणी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी योगदान दिले. ते जहाल मतवादी नेते होते. त्यांना पंजाब केसरी असे म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली. लाला लजपतराय, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल या त्रयींना लाल-बाल-पाल म्हणतात, त्यापैकी लालबद्दल ही संकलित ज्ञानवर्धक माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी लेखरूपाने वाचकांच्या सेवेत सादर करत आहेत... संपादक.

लाल- लाला लजपतराय यांचा जन्म दि.२८ जानेवारी १८३६ रोजी धुंढिके, पंजाब, ब्रिटिश भारतात झाला. वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. सन १८४९मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला. सन १८७०च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले. सुरुवातीच्या आयुष्यात लजपतराय यांचे उदारमतवादी विचार आणि हिंदुत्वावरील त्यांचा विश्वास त्यांचे वडील आणि अतिशय धार्मिक आई यांच्यामुळे तयार झाला. सन १८८०मध्ये लजपतरायांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथेच ते देशभक्त आणि भविष्यातील स्वातंत्र्यसैनिक लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त यांच्या संपर्कात आले. लाहोरमध्ये शिकत असताना स्वामी दयानंद सरस्वतींच्या हिंदू सुधारणा चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते आर्यसमाजाचे सदस्य बनले. तसेच लाहोर स्थित आर्य गॅझेटचे संस्थापक, संपादक बनले. हिंदुत्वावरील वाढत्या विश्वासामुळे ते हिंदू महासभेत सामील झाले. त्यामुळे त्यांना नौजवान भारत सभेच्या टीकेला सामोरे जावे लागले. कारण ही महासभा धर्मनिरपेक्ष नव्हती. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे पुढे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या यशस्वी आंदोलनासाठी त्यांनी शांततामय मार्गाने चळवळी केल्या. सन १८८४मध्ये त्यांच्या वडलांची बदली रोहतक येथे झाली आणि लाहोर येथील अभ्यास संपवून लजपतरायसुद्धा त्यांच्या बरोबर आले. सन १८८६मध्ये ते वडिलांच्या बदलीबरोबर हिसारला आले आणि तेथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. बाबू चूडामणींसह लजपतराय हिसारच्या बार कौन्सिलचे संस्थापकच सदस्य बनले. लाला लजपतरायांनी लिहिलेली पुस्तके- यंग इंडिया,द कलेक्टेड वर्क्स ऑफ लाला लजपत राय; संपादक: बी.आर. नंदा, लाला लजपत राय रायटिंग अ‍ॅन्ड स्पीचेस, मॅझिनी, गॅरिबाल्डी, शिवाजी महाराज यांची उर्दू भाषेत लिहिलेली संक्षिप्त चरित्रे, श्रीकृष्ण आणि त्याची शिकवण, महान अशोक आदी आहेत.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चूडामणी, चंदूलाल तयाल, हरीलाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ.रामजीलाल हुडा, डॉ.धनीराम, आर्यसमाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची सन १८८८ आणि १८८९मध्ये निवड झाली. सन १८९२मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आणि भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारिता सुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले. सन १८८६मध्ये त्यांनी महात्मा हंसराज यांना लाहोरमध्ये दयानंद अंग्लो-वैदिक स्कूलची स्थापना करण्यास मदत केली. भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीनंतर लाहोरमधील या विद्यालयाचे रूपांतर इस्लामिया कॉलेजमध्ये झाले. सन १९१४मध्ये स्वातंत्र्यलढ्यात योगदान देण्यासाठी लजपतरायांनी वकिलीला रामराम ठोकला. सन १९१४मध्ये ते ब्रिटनला गेले आणि नंतर सन १९१७मध्ये अमेरिकेला गेले. ऑक्टोबर १९१७मध्ये त्यांनी न्यू यॉर्कमध्ये भारतीय होमरूल लीगची स्थापना केली. ते सन १९२७ ते १९३०पर्यंत अमेरिकेत होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी झाल्यानंतर आणि पंजाबमधील राजकीय निदर्शनामध्ये भाग घेतल्यानंतर मे १९०७मध्ये कोणताही खटला न चालवता लाल लजपतरायांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. पण त्यांना अटक करून ठेवण्यासाठी पुरेसा पुरावा नाही, असे लॉर्ड मिंटो यांनी ठरवल्याने नोव्हेंबरमध्ये त्यांना परत जाण्याची परवानगी देण्यात आली. सन १९२०साली कोलकाता येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खास अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. सन १९२१मध्ये त्यांनी लाहोरमध्ये लोकसेवक मंडळ या 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावरील कल्याणकारी संघटनेची स्थापना केली. फाळणीनंतर या संस्थेचे कार्यालय दिल्ली येथे हलवण्यात आले. भारतभरात या संस्थेच्या अनेक शाखा आहेत. सन १९२८मध्ये भारतातील राजकीय परिस्थितीबद्दल अहवाल देण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने एका आयोगाची स्थापना केली. भारतातील राजकीय पक्षांनी या आयोगावर बहिष्कार घातला, कारण या आयोगाच्या सदस्यांमध्ये एकही भारतीयाचा समावेश नव्हता. या आयोगाविरुद्ध भारतभर निदर्शने झाली. दि.३० ऑक्टोबर १९२८ रोजी जेव्हा या आयोगाने लाहोरला भेट दिली, तेव्हा त्याविरुद्ध मूक निदर्शनांचे नेतृत्व लाला लजपत रायांनी केले. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट यांनी या निदर्शकांवर लाठी हल्ला करण्याचे आदेश दिले. जखमी होऊनसुद्धा लाला लजपतरायांनी या जमावासमोर भाषण केले, 'आज मी ज्या लाठ्या खाल्ल्या, त्या म्हणजे ब्रिटिश सरकारच्या भारतातील राजवटीच्या शवपेटिकेवरील शेवटचे खिळे ठरतील, असे मी जाहीर करतो.' हे त्यांचे यावेळचे उद्गार होते.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा–
७७७५०४१०८६.

निदर्शनांच्या वेळेला झालेल्या लाठी हल्ल्यातून लाला लजपतराय पूर्णपणे बरे झाले नाहीत आणि हृदय विकाराच्या धक्क्याने दि.१७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. स्कॉटच्या लाठीमारामुळेच लालाजींना मृत्यू ओढवला, असे डॉक्टरांचे म्हणणे होते. पण जेव्हा हा मुद्दा ब्रिटनच्या संसदेत उपस्थित करण्यात आला तेव्हा, यात आपली काहीही भूमिका नव्हती, असे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. या घटनेचा सूड घेण्याचे क्रांतिवीर भगतसिंग यांनी ठरवले. पण ऐनवेळी स्कॉटला ओळखण्यात चूक झाल्यामुळे भगतसिंगांना सॉन्डर्स या सहाय्यक पोलीस अधीक्षकावर गोळ्या झाडण्याचा इशारा करण्यात आला. त्याच दिवशी लाहोरमधील जिल्हा पोलीस मुख्यालयातून बाहेर पडणा□या सॉन्डर्सवर राजगुरू आणि भगतसिंग यांनी गोळ्या झाडल्या. या दोघांचा पाठलाग करणारा चननसिंग नावाचा हेड कॉन्स्टेबल चंद्रशेखर आझाद यांनी केलेल्या गोळीबारात जखमी झाला.

!! पावन जयंतीनिमित्त लाला लजपत राय यांना कोटी कोटी विनम्र

# विद्यार्थ्यांना रास्त दरात दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध!

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाअंतर्गत वसंतराव नाईक सरकारच्या कारकिर्दीत २७ जानेवारी १९६७ रोजी स्थापन केलेली संस्था असून बालभारती या नावाने ती ओळखली जाते. महाराष्ट्रातील शालेय अभ्यासक्रमासंबंधी संशोधन करणे, त्यानुसार शालेय अभ्यासक्रम तयार करणे, या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके तयार करणे आणि विद्यार्थ्यांना कमीत कमी व योग्य दरात तसेच वेळेवर पुस्तके उपलब्ध व्हावीत अशा पद्धतीने मुद्रण आणि वितरणाची व्यवस्था करणे ही कार्ये ही संस्था करते. संस्थेचे मुख्य कार्यालय पुण्यात आहे. तसेच औरंगाबाद आणि नागपूर येथे संस्थेची विभागीय कार्यालये आहेत. केवळ बालभारती या नावानेही ती ओळखली जाते. याबद्दलची रोचक व ज्ञानवर्धक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात प्रस्तुत केली आहे... संपादक.**

( महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ- बालभारती स्थापना दिवस.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ हे बालभारती प्रकाशनाद्वारे इयत्ता पहिली ते बारावीची सर्व विषयांची मिळून जवळपास चार कोटी पाठ्यपुस्तके छापून वितरित करते. पुस्तकांचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी राज्यात सध्या नऊ भांडारे आहेत. निरीक्षण, निवेदन, वर्गीकरण, तुलना, सहसंबंध, कार्यकारणभाव, उपयोजन, प्रयोगकौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, अनुमान काढणे, या क्षमता आत्मसात कराव्या, तसेच विज्ञानाच्या अभ्यासातून आवश्यक ते जीवन कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे, असा व्यापक दृष्टिकोन या पुस्तकनिर्मितीमागचा आहे. दरवर्षी सुमारे १९ कोटी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण बालभारती मार्फत केले जाते. महाराष्ट्रातील एक लाखाहून अधिक शाळांमधून बालभारतीची पुस्तके वापरली जातात. या पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्थापनेपूर्वी शाळांमध्ये खाजगी प्रकाशकांची पुस्तके वापरात होती. या पुस्तकाचा दर्जा, किमती मधील तफावत, त्यांची उपलब्धता, शाळेत पुस्तक लावताना होणारे गैरव्यवहार याबाबींची दखल कोठारी आयोगाने घेतली. दर्जेदार आणि रास्त किमतीमधील पुस्तके मुलांना वेळेत मिळावी यासाठी राज्याने स्वायत्त

संस्था निर्माण करावी, अशी शिफारस करण्यात आली. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार तत्कालीन वसंतराव नाईक सरकारने २७ जानेवारी १९६७ला महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थेची स्थापना केली. याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते दोन फेब्रुवारी १९६७ला झाले. मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्याकडे सोपविण्यात आली. तर मंडळाचे पहिले संचालक उत्तमराव सेवलेकर आणि पहिले नियंत्रक म्हणून शिक्षणतज्ज्ञ बापूराव नाईक होते. संस्थेचा सध्याचा पत्ता- बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४ असा आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ म्हणजे शैक्षणिक विकास व संशोधन करणारे मंडळ होय. ते दि.२७ जानेवारी १९६७ रोजी पुणे येथे स्थापन झाले. शालेय विद्यार्थ्यांना रास्त दरात दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध होण्यासाठी राज्यस्तरावर काम करणाऱ्या स्वायत्त संस्थेकडे पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे काम सोपवावे, अशा स्वरूपाची शिफारस कोठारी शिक्षण आयोगाने सन १९६६ साली केली होती. तिला अनुसरून या मंडळाची स्थापना झाली. प्रस्तुत मंडळ ही एक सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे.

मंडळाची उद्दिष्टे- १) शालोपयोगी पाठ्यपुस्तके, शिक्षकांकरिता हस्तपुस्तके व विद्यार्थ्यांसाठी व्यवसायपुस्तके तसेच शिक्षणविषयक इतर साहित्य तयार करणे, २) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि शिक्षणाच्या इतर शाखा यांतील अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांच्या सुधारणेसाठी तसेच पाठ्यपुस्तक निर्मिती, साहाय्यभूत शैक्षणिक साधने आणि विविध शिक्षणसाधने यांवरील साहित्याविषयी संशोधन करणे, ३) शिक्षणाच्या सर्वसाधारण दर्जामध्ये सुधारणा व्हावी या हेतूने अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे, त्याचा विकास करणे आणि शासनास किंवा अन्य योग्य प्राधिकरणास त्याची शिफारस करणे, ४) सर्व शाखांमध्ये शिक्षणाची प्रगती व्हावी यासाठी उपयुक्त किंवा आवश्यक अशा पुस्तकांचे व साहित्याचे मुद्रण, विक्रय व वितरण करणे, ५) शासनास देणगीदाखल मिळालेल्या कागदपत्रांचा संग्रह व उपयोग करणे आणि त्यासंबंधीचा हिशोब ठेवणे तसेच शासनाच्या वतीने पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्याविषयी योजना कार्यान्वित करणे, ही आहेत. मंडळाचे पुढीलप्रमाणे नऊ विभाग पाडण्यात आले आहेत- १) विद्याविभाग, २) सामान्य प्रशासन विभाग, ३) वितरण विभाग, ४) वित्त विभाग, ५) अंतर्गत-लेखापरिक्षण विभाग, ६) निर्मिती विभाग, ७) संशोधन विभाग, ८) ग्रंथालय विभाग, ९) किशोर विभाग. मंडळाचे मुख्य कार्यालय पुणे येथील बालभारती नामक इमारतीत असून निर्मिती विभाग वरळी,मुंबई येथे आहे. यांशिवाय पुणे, नागपूर, मुंबई-गोरेगाव व औरंगाबाद या चार ठिकाणी मंडळाची पाठ्यपुस्तक-भांडारे व वितरण केंद्रे आहेत. राज्यातील शैक्षणिक संस्थांनी मंडळाकडे नोंदणी करून क्रमिक पुस्तकांची मागणी केल्यास पुस्तक-विक्रेत्यांप्रमाणेच शैक्षणिक संस्थांना पुस्तकांच्या खरेदी किंमतीवर १५ टक्के वटाव दिला जातो. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये क्रमिक पुस्तकांचे वितरण सहकारी संस्थेमार्फतच केले जाते. मंडळाच्या धोरणविषयक सर्व बाबी नियामक मंडळ आखते व या नियामक मंडळातर्फेच पाठ्यपुस्तक मंडळाचे व्यवस्थापन चालते. राज्याचे शिक्षणमंत्री व शिक्षण संचालक हे मंडळाचे अनुक्रमे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत. नियामक मंडळावर या दोघांसह नऊ पदसिद्ध व सहा अपदसिद्ध सदस्य असतात. अपदसिद्ध सदस्यांची नियुक्ती शासनातर्फे सर्वसाधारणपणे दर तीन वर्षांनी होते.

मंडळाचे व्यवस्थापन पुढील समित्यांमार्फत चालते- १) कार्यकारी समिती, २) वित्त समिती, ३) विद्यापरिषद, ४) संशोधनसल्लागार परिषद व ५) निर्मिती व वितरण परिषद. मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार अधिक समित्या व उपसमित्या नियुक्त करण्याचे अधिकार नियामक मंडळास आहेत. अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी भाषा विषयांच्या एकूण सात समित्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, सिंधी, इंग्रजी या आहेत. तसेच इतिहास, भूगोल, गणित, शास्त्र, या भाषेतर विषयांसाठीही समित्या आहेत. मंडळाला दरवर्षी लागणारे खेळते भांडवल सुमारे ८ ते १० कोटी रु.हे बँकांकडून कर्जरूपाने पुस्तकसाठ्याच्या तारणावर वेळोवेळी मिळविले जाते व त्याची परतफेड पुस्तकविक्रीद्वारे मिळालेल्या रकमेतून केली जाते.

पाठ्यपुस्तकांची निर्मितीमंडळ अस्तित्वात आल्यानंतर अवघ्या चार वर्षांच्या कालावधीत इयत्ता १ ते ७ पर्यंतची पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. मंडळनिर्मित इ.१ ते ७ पर्यंतची पाठ्यपुस्तके मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, इंग्रजी आणि सिंधी (अरबी व देवनागरी लिपीत) या सात भाषांत प्रकाशित करण्यात आली. राज्यात सन १९७२मध्ये १०+२+३ या नव्या आकृतिबंधानुसार इयत्ता ८ ते १०च्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना झाली. पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारीत इयत्ता ८ वी इतिहास, बीजगणित व भूमिती या विषयांची पाठ्यपुस्तके मंडळाने खाजगी प्रकाशनासोबतच प्रकाशित केली. सन १९७३-७४ पासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या इयत्ता ८ ते १२च्या पाठ्यपुस्तकांची छपाई व वितरणांचे काम मंडळाने स्वीकारले. अशा प्रकारे आतापर्यंत मंडळाने इयत्ता १ ते ७ पर्यंतची एकूण ३९५ पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता ८ ते १२ पर्यंतच्या एकूण ३३१ पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण यांचे कामही मंडळ प्रतिवर्षी करत आहे. इयत्ता १ ते ७च्या भाषा व गणित या विषयांच्या नव्या मालेचे काम मंडळाने पूर्वीच क्रमश: हाती घेतले असून गणिताच्या मालेतील अखेरचे म्हणजेच इयत्ता ७ वीचे गणिताचे पाठ्यपुस्तक १९८४-८५ या वर्षी प्रकाशित झाले आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबरोबरच मंडळाने इयत्ता १ ते ७ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्फूर्तिगीतांचे एक पुस्तक तयार करून ते प्रसिद्ध केले. पाठ्यपुस्तकांतील काही निवडक कविता तसेच स्फूर्तिगीतांतील काही गीते निवडून मंडळाने १८ गीतांच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित केल्या आहेत. त्यांचे संगीत दिग्दर्शन वसंत देसाई यांनी केले तसेच बालभारती गीतमंजुषा प्रसिद्ध करून या गीतांची स्वरलिपीही उपलब्ध करून दिली.

मराठी बालभारती इयत्ता पहिली हे मंडळाचे पहिले पुस्तक १९६८ मध्ये प्रकाशित झाले. २०१३ पासून बालभारतीच्या सहाव्या मालेचे प्रकाशन सुरू आहे. आठ भाषा माध्यमातून सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करणारे मंडळ हे बालभारतीचे वैशिष्ट्य आहे. बालभारती ही राज्यशासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेली स्वायत्त संस्था आहे.

राज्याचे शिक्षणमंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. संस्थेचे सर्व धोरणात्मक निर्णय नियामक मंडळात घेतले जातात. पाठ्यपुस्तके तयार करण्याचे मुख्य काम विद्या विभागात चालते. विद्या विभागांतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू, गुजराती या आठ भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे एकूण १४ विभाग आहेत. पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी विषयवार समित्या असतात. मंडळातील त्या त्या विषयाचे अधिकारी विषय समित्यांमध्ये सदस्य-सचिव म्हणून काम करतात. पाठ्यपुस्तकांखेरीज इतर अनेक पुस्तकांचे प्रकाशन बालभारती करते. ही पुस्तके अध्ययन-अध्यापनाला पूरक असतात. दि.१४ नोव्हेंबर १९७१पासून आठ ते १४ वर्षे वयोगटातल्या मुलांसाठी किशोर हे मासिक मंडळाने सुरू केले. त्यातील उत्तम साहित्याचे १४ खंड प्रकाशित झाले आहेत, हे कार्य उल्लेखनीयच!

!! बालभारती मंडळ स्थापना दिनाच्या समस्त शिक्षणप्रेमी भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

– संकलन व सुलेखन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# नागरी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने पुंडलिकनगर प्रजासत्ताक दिन येथे उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पुंडलीकनगर येथील नागरी विकास सेवाभावीसंस्था वतीने शिवराणा वाचनालय येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन सामाजिक कार्यकर्ते एल डी ताटू यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला सकाळी ८.३० वाजता ज्येष्ठ नागरिक दुर्गासिंग माहेर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या कार्यक्रमास शहरातील ज्येष्ठ नागरिकासह महिला व तरुण मंडळी उपस्थित होती या उपस्थित या उपस्थित त्यामध्ये नारायण महेर जगन्नाथ गवळी प्रविण राजपूत, विकास शिंदे, चदंनसिंग कायटे, गोवर्धन शेवगण, सूर्यकांत तुपकर, दामू थोरात प्रकाश देशमुख, बबनराव चंदने, जगन्नाथ सुपेकर, जादूसिंग महेर, आनंद बारवाल, संदीप ताटू आदींची उपस्थिती होती.

# प्रजासत्ताक दिनी रक्तदान शिबिराचे आयोजन; २५ दात्यानी केलं न्यायनगर येथे रक्तदान



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रजासत्ताक दिनी रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन २५ दात्यानी केलं न्यायनगर येथे रक्तदान छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित न्यायनगर मित्र मंडळ व नागरी विकास सेवाभावीसंस्था व रक्तदान शिबिराचे उद्घाटन एल.डी. ताटू सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते झाले.

यावेळी संयोजक नागरी विकास सेवाभावीसंस्था व न्यायनगर मित्र मंडळ व केअर फोर एव्हरी वन संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रंगनाथ काळे व डॉ. देविदास जाधव, गणेश शिंदे होते. या वेळी संयोजक स्वप्निल जाधव रुपेश देवणकर आशिष पवार ताटू यांनी रक्त दिल्याने रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी सगळ्यात मोठं दान आहे ते सगळ्यांनी करावं आम्ही जन सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून कार्यरत आहेत या वेळी रक्तदाते आशिष पवार, किरण पवार, सुरेश चव्हाण, ज्ञानेश्वर पवार, दिपक आल्हाड, पवन भिसे, सुनील खिल्लारे, अजिंक्य साळवे, जयेश ताबोरे, रुषिकेश निसर्ग, राहुल आल्हाड, धम्माल आव्हाड, रुपेश देवणकर, स्वप्निल जाधव आदी. एल.डी. ताटू यांचा नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग असतो. सर्वांना सोबत घेवून चालण्याची त्यांची वृत्ती आहे.

# गणराज्य दिन संविधान सन्मान दिवस म्हणून साजरा करण्यात आला



**नागपूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गणराज्य दिन हा भारतीय संस्कृतीसाठी फार महत्त्वाचा दिवस आहे या दिवसाचे महत्त्व अद्याप कितेक लोकांना माहीत नाही जेव्हा हा दिवस उजाडला तो पहिला सुर्याची किरणे समता, बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य न्याय दया घेऊन आला हाच भारतीय लोकांच्या खरा सन त्योहार आहे असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले ते गणराज्य दिनानिमित्त संविधान निर्मात्याला पुष्पहार अर्पण करताना संविधान चौक येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना बोलत होते या प्रसंगी आंरिमो चे पदाधिकारी देवेंद्र बागडे, नामदेवराव निकोसे,प्रा.रमेश दुपारे,राजु कांबळे, भाऊराव बोरकर, प्रकाश कांबळे, राजीव पांजरे,के.टी.कांबळे , चरणदास गायकवाड,शालिक बांगर, मनोहर इंगोले, रामभाऊ वाहणे, वैशाली तभाने सुनिता चांदेकर संगिता चंद्रीकापुरे, डॉ सुधा जनबंधू,पुनम शर्मा, वंदना डोये महानंदा ईलमकर ज्ञानेश्वर ढेंगरे रोहन बागडे संगिता वासनिक, रूबीना खान सुधाकर बोरकर भागनबाई मेश्राम सह मोठ्या संख्येने महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

# ६३९७८ विद्यार्थी इ.१२ वी तर ६८२२३ देणार इ.१० वी ची परीक्षा परीक्षा कॉपीमुक्त व तणावमुक्त व्हाव्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे येत्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षा होणार आहेत. जिल्ह्यात इयत्ता १२ वी ची परीक्षा ६३ हजार ९७८ विद्यार्थी तर इयत्ता १० वी ची परीक्षा ६८ हजार २२३ विद्यार्थी देत आहेत. त्यासाठी एकूण ३९९ परीक्षा केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा ह्या कॉपीमुक्त आणि तणावमुक्त व्हाव्यात. तसेच त्यासाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षा होणार आहेत. इयत्ता १० वीची परीक्षा दि.२१ फेब्रुवारी ते १७ मार्च या दरम्यान असून इयत्ता १२ वी ची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान होणार आहेत. इयत्ता १२ वी साठी जिल्ह्यात १६१ केंद्र असून ६३ हजार ९७८ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. त्यासाठी २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर इयत्ता १० वी ची परीक्ष २३८ केंद्रांवर होणार असून ६८ हजार २२३ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठीही २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुकानिहाय परीक्षा केंद्र व विद्यार्थी संख्या या प्रमाणे-

इयत्ता १० वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- १७ केंद्र ५९२२ विद्यार्थी, छत्रपतीसंभाजीनगर शहर-७५ केंद्र २१ हजार ७५८ विद्यार्थी, गंगापूर ३१ केंद्र, ९८२० विद्यार्थी, कन्नड २२ केंद्र ५७१३ विद्यार्थी, खुलताबाद ११ केंद्र, २६३४ विद्यार्थी, पैठण-२१ केंद्र, ५९६० विद्यार्थी, सिल्लोड-२५ केंद्र ६६०७ विद्यार्थी, सोयगाव-६ केंद्र, १५०१ विद्यार्थी, वैजापूर १७ केंद्र, ४८१९ विद्यार्थी फुलंब्री १३ केंद्र ३४८९ विद्यार्थी.

इयत्ता १२ वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- २० केंद्र ८०८६ विद्यार्थी, छत्रपतीसंभाजीनगर शहर-३३ केंद्र १४ हजार २५५ विद्यार्थी, गंगापूर १४ केंद्र, ६४०० विद्यार्थी, कन्नड १९ केंद्र ६०१२ विद्यार्थी, खुलताबाद १२ केंद्र, ४६२५ विद्यार्थी, पैठण-१६ केंद्र, ५८०२ विद्यार्थी, सिल्लोड-१७ केंद्र ६०५३ विद्यार्थी, सोयगाव-८ केंद्र, ३११४ विद्यार्थी, वैजापूर ११ केंद्र, ५३०१ विद्यार्थी फुलंब्री ११ केंद्र ४३३० विद्यार्थी.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, शिक्षण विभागासह सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून काम करावे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे काम करणा□्या शिक्षक, शिक्षण संस्था व केंद्र यांचा सन्मान केला जाणार असून कॉपी करण्यासाठी प्रवृत्त करणा□्या व्यक्तीवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आज परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी दक्षता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) अश्विनी लाटकर, शिक्षण मंडळ सहसचिव सचिव प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षण अधिकारी(योजना) अरुणा भूमकर यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात १० वी आणि १२ वीच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे,अशी माहिती श्रीमती लाटकर यांनी दिली. शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही याची खबरदारी परीक्षा केंद्र, संस्था चालक, नियुक्त कर्मचारी,अधिकारी, पोलीस यंत्रणा यांनी घ्यावी, असे लेखी आदेश देण्यात येतील. कॉपी होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून केंद्राच्या जवळ असणा□्या झेरॉक्स मशीन बंद करण्यात येतील. परीक्षाकेंद्राबाहेर पालकांची होणारी विनाकारण गर्दी, विविध पुस्तकांची विक्री थांबवण्यात यावी, याबाबतचे सर्वेक्षण संबंधित तालुकास्तरावर शिक्षण विभागातील अधिका□्यांनी करावे.

परीक्षा केंद्राबाहेर प्रतिबंधात्मक लागू करण्याविषयीचे आदेश निर्गमित करण्यात यावे. परीक्षा केंद्रावर भरारी पथक, बैठे पथक, केंद्रामधील बदल व स्थानिक वातावरण यानुसार नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षण विभागांना दिल्या. कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी लोकांमध्ये जाणीव जागृतीसाठी समुपदेशन, कार्यशाळा,विविध कार्यक्रम, प्रसारमाध्यमातून आवाहन करावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कॉपीमुक्त आणि तणावरहीत परीक्षा पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात अग्रेसर करु- पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि.२६(जिमाका) – देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात अग्रेसर बनवू असा निर्धार यावेळी पालकमंत्री शिरसाट यांनी व्यक्त केला. त्यासाठी सर्व समाजघटकांना सोबत घेऊन आपली वाटचाल असेल. सगळ्यांनी जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे,असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

पोलीस आयुक्तालयातील देवगिरी मैदानावर हा मुख्य शासकीय सोहळा पार पडला. विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संदिपान भुमरे, आ. प्रदीप जयस्वाल, माजी खासदार चंद्रकांत खैरे तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपत्री संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे संचालक जगदीश मिनीयार, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर आयुक्त डॉ. अरविंद लोखंडे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास म ानवंदना देण्यात आली. राज्यगीतही सादर झाले. पालकमंत्र्यांनी परेड निरीक्षण करुन उपस्थितांना अभिवादन केले. पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, समाजातील सर्व घटकांना सोबत घेण्याचे आणि समाजातील विविध घटकांना मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी विविध योजना शासनाने राबविल्या आहेत. पालकमंत्री म्हणून माझीही जबाबदारी आहे. यंदा आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी १२०० कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे.

ते पुढे म्हणाले की, आपल्या जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा आहे. म्हणून या जिल्ह्याची



जबाबदारीही मोठी आहे.

अजिंठा वेरुळ सारखे जागतिक वारसास्थळे आपल्या जिल्ह्यात आहेत. त्यांच्या विकासासाठीही तरतूद करण्यात आली आहे. म्हणून राज्याच्या प्रगतीत आपले योगदान असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपला जिल्हा राज्यात अग्रेसर करण्यासाठी आपण सारे मिळून प्रयत्न करु.

शहराच्या विकासासाठीही विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शहर पाणीपुरवठा योजना पूर्ण करुन येत्या एप्रिल पर्यंत शहराला मुबलक पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यादृष्टीने यंत्रणेने प्रयत्न करावे. शहरात म हापुरुषांची स्मारके होत आहेत. त्यापासून प्रेरणा घेऊन सर्व जातीधर्माच्या घटकांनी जिल्ह्याच्या विकासात आपले योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले.

नुकत्याच झालेल्या दावोस येथील उद्योग परिषदेत महाराष्ट्राच्या वतीने झालेल्या सामंजस्य करारातील बहुतांश उद्योग हे आपल्या जिल्ह्यात येत आहेत. त्यामुळे औद्योगिक जिल्हा म्हणून आपल्या जिल्ह्याची ओळख निर्माण होणार आहे. हे सरकार हे सगळ्यांचे सरकार आहे. आपण सगळ्यांनी एकोप्याने राहुन आपल्या जिल्ह्यातील शांतता कायम राखू. आपले योगदान देऊ आणि जिल्हा अग्रेसर करु, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले.आपल्या भाषणात पालकमंत्र्यांनी विविध विभागांमार्फत होत असलेल्या विकास योजना व उपाययोजना यांची माहितीही सांगितली.

विविध सन्मान

प्रजासत्ताक दिन समारंभात विविध क्षेत्रात कामगिरी केलेल्या व्यक्तिंचा सम्नान करण्यात आला. ध्वजनिधी संकलनासाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, सहा. फौजदार एकनाथ दत्तू गायकवाड, तुकाराम आव्हाळे, जीवन रक्षा पदक मिळालेले पोलीस उपनिरीक्षक नजीर नासिर शेख, हवलदार दादासाहेब गोविंद पवार तसेच लोकसेवा हक्क अधिनियमानुसार १०० टक्के प्रकरणांमध्ये विहीत कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करणारे संदीप काळे.

सय्यद नविदोद्दीन , संजीव शिंदे, श्रीमती सरला देशमुख, सुनिता पदमे, रामकृष्ण बारगळ, संगिता जाधव,डॉ. सुमय्या सैय्यद तसेच सहा. पोलीस उपनिरीक्षक शेख सलीम शेख गनी, हवलदर रामभाऊ खंडागळे तसेच वर्षा देशमुख, मुख्याध्यापकन जि.प. आदर्श उच्च माध्यमिक शाळा जळगाव मेटे, श्रीमती कालिंदी जाधव,ग्राम पंचायत सावखेडा खंडाळा, डॉ. मोनम डव्हळे, आरती कानिसे सरपंच गोलवाडी ग्रा.पं., सुनिल मंगरुळे ग्रामसेवक श्रीराम चव्हाण, सिद्धार्थ दांडगे, उत्तम चव्हाणे सरपंच देव्हारी, तसेच ग्रामपंचायत जरंडी, दादेगाव जहांगीर, कुंभेफळ , गोलवाडी यांनाही सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिकांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रविणा कन्नडकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

## भाजपावर मतदारांसह देणगीदारांचीही कृपा, वर्षभरात तब्बल ३,९६७ कोटींच्या देणग्या, ८७ टक्के वाढ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

निवडणूक रोखे असो अथवा थेट देणग्या, प्रत्येक ठिकाणी भाजपाच्या झोळीत हजारो कोटी रुपये पडत असल्याचं गेल्या काही वर्षांपासून पाहायला मिळत आहे. २०२३-२४ मध्ये भाजपाला हजारो कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत. विशेष म्हणजे २०२२-२३ या आर्थिक वर्षांत भाजपाला मिळालेल्या देणग्यांमध्ये २०२३-२४ मध्ये तब्बल ८७ टक्के वाढ झाली आहे. भाजपाला तब्बल ३,९६७.१४ कोटी रुपये देणगी स्वरुपात मिळाले आहेत. पक्षाला मिळालेल्या एकूण देणग्यांमधील निवडणूक रोख्यांचं प्रमाण कमी झालेलं दिसत आहे. भाजपाच्या २०२३-२४ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालातून (ऑडिट) ही माहिती समोर आली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केलेल्या वार्षिक अहवालानुसार भारतीय जनता पार्टीला २०२२-२३ मध्ये २,१२०.०६ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या. २०२३-२४ मध्ये या देणग्या जवळपास दुप्पट झाल्या आहेत.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अहवालानुसार भाजपाला निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून १,६८५.६२ कोटी रुपये मिळाले आहेत. भाजपाला मिळालेल्या एकूण देणग्यांपैकी ४३ टक्के हिस्सेदारी निवडणूक रोख्यांची आहे. २०२२-२३ मध्ये भाजपाला निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून १२९४.१४ कोटी रुपये मिळाले होते. २०२२-२३ मध्ये भाजपाला मिळालेल्या एकूण देणग्यांपैकी ६१ टक्के हिस्सा हा निवडणूक रोख्यांचा होता. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे (इलेक्टोरल बॉण्ड) योजना घटनाबाह्य ठरवत रद्द केली होती.

संसदीय लोकशाहीत व्हीपचं महत्त्व काय? सभापती धनखड ही प्रणाली रद्द का करु पाहत आहेत?

निवडणुकीमुळे खर्चही वाढला, केवळ जाहिरातींवर ५९१ कोटींचा खर्च

इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार भाजपाला मिळालेल्या देणग्यांमध्ये वाढ झाली आहे, त्याचबरोबर त्यांच्या खर्चातही मोठी वाढ झाली आहे. २०२४ हे निवडणुकांचं वर्ष होतं. त्यामुळे या वर्षात निवडणूक प्रचारावर हजारो कोटी रुपये खर्च होतील अशी अपेक्षा होती. त्यानुसार भाजपाने गेल्या वर्षी १,७५४ कोटी रुपये खर्च केले. २०२२-२३ मध्ये भाजपाने १,०९२ कोटी रुपये खर्च केले होते. भाजपाने गेल्या वर्षी ५९१ कोटी केवळ जाहिरातींवर खर्च केले आहेत.

काँग्रेसच्या देणग्यांमध्ये ३२० टक्के वाढ

भाजपासह इतर पक्षांना मिळालेल्या देणग्यांची माहिती देखील समोर आली आहे. सर्वाधिक देणग्या मिळालेल्या पक्षांमध्ये भाजपानंतर काँग्रेस दुसऱ्या नंबरवर आहे. काँग्रेसला २०२३-२४ मध्ये १,१२९ कोटी रुपये देणगी स्वरुपात मिळाले आहेत. २०२२-२३ च्या तुलनेत यात तब्बल ३२० टक्के वाढ झाली आहे. २०२२-२३ मध्ये भाजपाला २६८ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या.

धर्मासाठी बॉलीवूड सोडणारी 'बिग बॉस' फेम सना खानने ५ जानेवारीला दुसऱ्या मुलाला जन्म दिला. तिने मुलाचे नाव सय्यद हसन जमील ठेवले आहे. सना आणि तिचा पती मुफ्ती अनस सय्यद यांनी मुलाबरोबरचे फोटो शेअर केले आहेत, ज्यात मोठा मुलगा तारिक जमीलही दिसतो. सना खानने २०२० मध्ये मुफ्ती अनस सय्यदशी लग्न केले होते. ती सोशल मीडियावर सक्रिय आहे.

## कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला अ+ दर्जा मिळवून दिल्याबद्दल काँग्रेसच्या वतीने अभिनंदन आणि सत्कार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पोलीस स्टेशन निर्माण करण्याची मागणी शहर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष डॉ.अरुण शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या कुलगुरू म्हणून नियुक्ती च्या यशस्वी वर्षपूर्ती च्या निमित्ताने त्यांना काँग्रेस च्या वतीने सन्मान देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी अनिस पटेल सरचिटणीस शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, मोईन इनामदार शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक अध्यक्ष प्रा.शिलवंत गोपनारायण (विद्यार्थी नेतृत्व), पवन साळवे, अमोल सरदार, सचिन राजपूत, रामेश्वर गोरे आदी पदाधिकारी व शिष्टमंडळ उपस्थित होते.

विद्यापीठात लवकरच पोलीस स्टेशन उभारण्यात येईल असे आश्वासन यावेळी माननीय कुलगुरू साहेबांनी दिले.यावेळी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलगुरू महोदयांसोबत, प्र.कुलगुरू डॉ.वाल्मिकी सरवदे, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान चे डॉ.एम.डी. शिरसाट, डॉ. संजय मोहोड आदींची उपस्थिती होती.

## शपथ 'बेटी बचाओ बेटी पढाओ'ची महिलांच्या बरोबरीच्या सहभागानेच होईल देशाची प्रगती- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका) - प्रत्येक क्षेत्रात महिला कार्यरत आहेत. मात्र एवढ्यावरच न थांबता आता प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग हा पुरुषांच्या बरोबरीने व्हायला हवा, तरच देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल. मुलींचा घटता जन्मदर ही एक सामाजिक समस्या असून ती सोडविण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. यावेळी उपस्थितांना बेटी बचाओ बेटी पढाओ ची शपथ देण्यात आली.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेस १० वर्षपूर्ती झाल्यानिमित्त महिला व बालविकास विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुवर्णा जाधव, जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा चिमंद्रे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्यात मुलींचा घटता जन्मदर ही चिंतेची बाब आहे. गर्भलिंग निदान तपासणी, कन्याभ्रूण हत्या।

बालविवाह सारख्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कायदे असले तरी सर्वसामान्य लोकांपर्यंत याबाबतचे प्रबोधन, जनजागृती पोहोचून लोकशिक्षण व्हायला हवे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजाचे संतुलन साधण्यासाठी महिला व पुरुषांचे प्रमाण योग्य हवे. महिलांचा सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग हवा, तरच देशाची प्रगती होईल. शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रत्येक उपक्रमाचे इष्ट परिणाम दृष्टिपथास यावे. हे अभियान प्रत्येक ग्रामपंचायतस्तरापर्यंत नेण्यात यावे,असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

## रिपब्लिकन बहुजन फोर्स संघटनेच्या वतीने परभणी ते मुंबई लाँग मार्चचे जोरदार स्वागत



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील सोमनाथ सुर्यवंशी, पँथर नेते विजयदादा वाकोडे, बीड येथील संताष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी देण्यात यावी, यासाठी परभणी येथून परभणी ते मुंबई लाँग मार्च आंबेडकरी जनतेच्या वतीने काढण्यात आला आहे. हा लाँग मार्च दि.२७/०१/२०२५ रोजी औरंगाबादेत पोहोचला. या लाँग मार्चचे स्वागत धूत हॉस्पीटल येथील चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ, रिपब्लिकन बहुजन फोर्स संघटनेच्या वतीने संघटनाप्रमुख मुकूंदभाई दाभाडे यांच्या नेतृत्वाखाली हजारो कार्यकर्त्यांनी केले. यावेळी लाँग मार्च मधील सर्व भिमसैनिकांनी अल्पोहार, पाणी, बिस्कीट देण्यात आले. यावेळी मा. महापौर प्रकाश निकाळजे, मा. नगरसेवक गौतम लांडगे, गौतम खरात, पँथर नेते नानासाहेब शिंदे, विजय मोरे, सुधाकर घोरपडे व विविध पक्ष संघटनेचे राजु होर्शिळ, दिलीप पाडमुख, काकासाहेब काकडे, ॲड. डी. बी. खिल्लारे, दिलीप हिवराळे, विजय जाधव, प्रविण गडबडे, महेंद्र गवई, संजय जाधव, संजय पंडीत, सुरेश हिवराळे, युनुस पठाण, अमोल गढवे, हिरालाल मगरे, निवृत्ती घोरपडे, अर्जुन शिंदे, निवृत्ती शिंदे, विजय खरात, सांडू साळवे, डॉ. अभिमन्यु गायकवाड, महिला आघाडीच्या रमाबाई इंगोले, आशाबाई खिल्लारे, निर्मला सोनवणे, संमिद्राबाई शिंदे, लता लांडगे, अंतिकाबाई आंबुरे, सुमनबाई आघाडे, वंदना नावकर, कविता चाबुकस्वार, कुसुम लोखंडे, अश्विनी बागुल, मंजुषा पगारे यांच्यासह महिला व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजित दाभाडे, अनिकेत दाभाडे, आर्यन शिंदे, प्रितम दाभाडे, सचिन गढवे, पप्पु नन्नावरे, रितेश गढवे, दिपक तारे, प्रताप बनसोडे इत्यादींनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम निवडणूक प्रक्रियेतील यश सामुहिक प्रयत्नांमुळेच - विभागीय आयुक्त दिलीप गावडे



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सन २०२४ चे निवडणुकांचे वर्ष होते. या एकाच वर्षात लोकसभा आणि विधानसभा या दोन महत्त्वाच्या निवडणुका पार पडल्या. निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय सहकार्य आवश्यक असते, ते एक सामुहिक कार्य असून त्यातील प्रत्येकाचे योगदान हे सारखेच मोलाचे आहे,असे प्रतिपादन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज येथे केले

राष्ट्रीय मतदार दिन (दि.२५ जानेवारी) कार्यक्रमाचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनीयार, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहा, निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सगळ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र सन्मानपूर्वक वितरण करण्यात आले. त्यानंतर हर्सूल गाव येथील मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. तसेच निवडणूक कालावधीत मतदार जनजागृतीचा भाग म्हणून घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, नाटक स्पर्धा विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

तसेच नव्याने मतदार नोंदणी केलेल्या युवा मतदारांना मतदार ओळखपत्रही वाटप करण्यात आले.

मनपा आयुक्त जी.श्रीकांत यांनी निवडणूक प्रक्रियेत सगळ्या विभागांनी केलेल्या कामगिरीचा उल्लेख करुन सांगितले की, निवडणूक प्रक्रिया राबविणे हे प्रशासकीय कौशल्याचे काम आहे.

सर्व नियम व कायद्यांचा अभ्यास करुन त्याची योग्य अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी सर्व विभागांचा एकमेकांशी संवाद व समन्वय आवश्यक असतो.

प्रास्ताविक देवेंद्र कटके यांनी तर सुत्रसंचालन डॉ. मीरा ढास यांनी केले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण



**छत्रपती संभाजीनगर - प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

**यात्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उमाकांत पारधी, डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, रामदास दौंड, प्रविण फुलारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच सर्व अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.**

## प्रजासत्ताक दिनःमुख्य शासकीय सोहळा देवगिरी मैदानावर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर रविवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा नऊ वा. आयोजीत करण्यात आला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. या कार्यक्रमास सर्व स्वातंत्र्यसेनानी, लोकप्रतिनिधी, अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. मुख्य शासकीय समारंभात लोकांना सहभागी होता यावे यासाठी सकाळी साडेआठ ते दहा यावेळात ध्वजारोहणाचा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजीत करण्यात येऊ नये. त्यांनी हे समारंभ सकाळी साडेआठ पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावे,असे अपर आयुक्त सामान्य प्रशासन डॉ. अरविंद लोखंडे यांनी कळविले आहे.


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**